# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/03/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. जलालखेडा :— फिर्यादी/पिडीता वय १५ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अप. क्र. ६५/२१ कलम ३५४ (अ), ३२३ भांदवि. सहकलम ०८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील अल्पवयीन फिर्यादी ही शेतात बकऱ्या चारण्याकरीता गेली होती. यातील **आरोपी नामे— हिरालाल बाबुराव जांबु वय ४६ वर्ष रा. जलालखेडा** हा काम करीत असतांना त्याने मक्याचे कणीस तोडण्यासाठी फिर्यादीला बोलावले. शेतात फिर्यादीची कंबर पकडुन पायात पाय अडकवुन खाली पाडले व फिर्यादी ओरडली असता आरोपीने फिर्यादीच्या तोंडावर दुपट्टा टाकुन मारहाण केली व तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र सोनवने यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ३१/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती राऊत मॅडम नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ८ पोक्सो मध्ये ०४ सश्रम कारावास व २०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०२ महिने साधी कैद कलम ३२३ भांदवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड दड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी गवळी मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा कोरडे पोस्टे जलालखेडा यांनी मदत केली आहे.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. काटोल** :— यातील फिर्यादी नामे— मंगेश एकनाथजी जिचकार, वय २५ वर्ष, रा. धवड ले आउट काटोल यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. क्र. ५१/१४ कलम ३०७ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी व आरोपी नामे— **वैभव प्रकाश कावडकर, वय २५ वर्ष, रा. रामदेवबाबा ले आऊट काटोल** हे एकमेकाचें शेजारी राहतात. घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या मोबाईलवर फोन करून आरोपीने शिवीगाळ केली. यांनतर आरोपी हा त्याच्या मोटरसायकलने फिर्यादीचे घरासमोर येवुन क्षुल्लक कारणावरून वाद घालुन कुऱ्हाडीने फिर्यादीचे हातावर, कमरेवर व ईतर ठिकाणी मारून फिर्यादीस गंभीर जखमी केले व जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरण्याचे तपास पोलीस निरीक्षक श्री. बी. एन. ठाकरे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ३१/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश पी. बी. घुगे नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३२६ भांदवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी लिना गजभिये मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशि प्रमोद कोहळे पोस्टे काटोल यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**